ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक गुरुवार, २० जुलै २०१७

सामना



केशायुर्वेदच्या प्रथम वर्धापन दिन समारंभात 'आयुर्वेदाच्या स्मृती'तून पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. सतीश डुंबरे, डॉ. अरुण जामकर, हरीश पाटणकर, मंदार जोगळेकर आदी यावेळी उपस्थित होते.

# 'आयुर्वेदाला संशोधन आणि तंत्रज्ञानाची जोड देण्याची गरज'

पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) – आयुर्वेदाला तंत्रज्ञान आणि संशोधनाची जोड मिळाल्यास त्यात सुपरस्पेशालिटी येऊ शकते, असे मत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण जामकर यांनी मांडले.

आरोग्यवर्धिनी चिकित्सालय आणि 'बीव्हीजी इंडिया'तर्फे केशायुर्वेदच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित 'आयुर्वेदाच्या स्मृतीतून' पुस्तकाचे प्रकाशन व केशायुर्वेदच्या तीस उपकेंद्र प्रमुखांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. 'बुकगंगा इंटरनॅशनल'चे मंदार जोगळेकर, बीव्हीजी इंडियाचे दत्ताजी गायकवाड, वैशाली गायकवाड, स्वप्नाली गायकवाड, डॉ. सतीश डुंबरे, डॉ. सरिता गायकवाड, वैद्य हरीश पाटणकर, स्नेहल पाटणकर आदी यावेळी उपस्थित होते. डॉ. जामकर म्हणाले, आयुर्वेदात आणखी मोठ्या प्रमाणात संशोधन होणे गरजेचे आहे. केसांची आयुर्वेदाच्या साहाय्याने निगराणी होणे ही काळाची गरज आहे.

जोगळेकर म्हणाले, पाश्चात्त्य देशांमध्ये संशोधनाच्या जोरावर आयुर्वेद सिद्ध केले जात आहे. अशावेळी आपले मूळ शास्त्र असलेले आयुर्वेद जगभर पोहोचले पाहिजे. त्यासाठी संशोधन आणि साहित्यनिर्मिती व्हायला हवी.

डॉ. सतीश डुंबरे म्हणाले, केसांवर आयुर्वेदातून उपचार हा नवीन विचार आहे. अशा प्रकारचा अभ्यासक्रम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात फेलोशिपच्या अंतर्गत सुरू करण्याचा प्रयत्न केला जाईल.